दै. पुण्यनगरी दि. 26/02/2024

# घरे फोडणारे दोघे जेरबंद; ५९ हजारांचा ऐवज जप्त



**नांदेड/प्रतिनिधी**

शहरातील इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरे फोडणाऱ्या दोन चोरट्यांना इतवारा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने जेरबंद केले असून त्यांच्याकडून ५९ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या दोघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांची पोलीस कोठडीत रवानगी केली.

इतवारा पोलीस ठाण्यात दाखल ४९/२४ या घरफोडीच्या गुन्ह्यातील राजु पवार (२३,रा. ब्रम्हपुरी चौफाळा नांदेड) व शेख समीर (२३, रा.वाजेगांव ता. जि. नांदेड) या दोघांना इतवारा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीला गेलेले सोन्याचे शॉर्ट गंठण, सोन्याची अंगठी, चांदीची चैन असा ५० हजार रुपयांचा ऐवज हस्तगत केला. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांची पोलीस कोठडीत रवानगी केली. इतवारा पोलिसांनी या दोघांना पोलिसी खाक्या दाखविताच त्यांनी त्यांचा साथीदार सय्यद अरिफ सय्यद फारुख (रा. गाडीपुरा नांदेड) हाही या चोरीत सहभागी असल्याची माहिती दिली.

इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या २९/२४ या गुन्ह्याची राजू पवार याने कबूली दिली असून या गुन्ह्यातील पाण्याची टाकी, प्लेट , पाण्याची मोटार, खुर्ची असा एकुण ९ हजार २०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या दोन्ही गुन्ह्यात ५९ हजार २०० रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि चौधरी, सहा. पोलीस उपनिरीक्षक बी.एन. गजभारे, डी.बी. बिसाडे, जमादार मोहन हाके, एकनाथ मोकले, पोलीस नायक हबीब चाऊस, मिलींद नरबाग, लक्ष्मण दासरवार,धिरज कोमुलवार, काकासाहेब जगताप, नजरे आजम देशमुख, कोरनुळे, गायकवाड, राठोड यांनी ही कारवाई केली. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी या पथकातील कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.